तक्रार शाखा 3636/2023
धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
मुंबई यांचे कार्यालय.
दिनांक :- १४/०७/२०२३
14 JUL 2023

**परिपत्रक क्रमांक :-६०२/२०२३, दि.१४/०७/२०२३**

**विषय :- जिल्हा कार्यालयांत प्रलंबित असलेल्या निरीक्षक चौकशी बाबत.**

असे निदर्शनास आले आहे की, जिल्हा कार्यालयात प्रदिर्घ कालावधीपासुन निरिक्षक चौकशी प्रकरणे प्रलंबित आहेत. न्यासाच्या व्यवस्थापनाबाबत तक्रारीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे, त्यामुळे धर्मादाय संघटनेची प्रतिमा मलिन होत आहे. धर्मादाय संघटनेतील बहुतांश निरिक्षकांकडून चौकशीची विवरणपत्रे मुख्यालयास प्राप्त होत नाहीत, तसेच प्राप्त विवरणपत्रे हे प्रत्येक कार्यालयान्वये वेगवेगळया नमुन्यामध्ये दाखल होतात.

तरी, याव्दारे सर्व अधिनस्त कार्यालयांना निर्देशीत करण्यात येते की,

०१. निरिक्षक चौकशी प्रकरणे हाताळणा-या निरिक्षकांनी सोबत जोडलेल्या विहीत मधील नमुन्यातच (परिशिष्ठ- अ) विवरणपत्रे दाखल करावी व सदर मासिक विवरणपत्रे दरमहा १० तारखेपर्यत मुख्यालयात पोहचतील याची दक्षता घ्यावी.

०२. काही निरिक्षकांकडे २०-२५ वर्षापासून निरिक्षक चौकशी प्रकरणे प्रलंबित आहेत. प्रथमतः सन २०२० पूर्वीच्या प्रकरणांवर कार्यवाही करुन प्रलंबितता शुन्य राहण्यासाठी संबंधीत सर्व कार्यालय प्रमुखांनी डिसेंबर २०२३ अखेर पर्यतचे नियोजन करावे. आवश्यकता वाटल्यास याबाबत संबंधीत धर्मादाय सह आयुक्त यांच्या मार्गदर्शना खाली " विशेष अभियान " राबवून सन २०२० पूर्वीची निरिक्षक चौकशी प्रकरणे शुन्य राहतील याची दक्षता घेण्यात यावी.

०३. मा.धर्मादाय आयुक्त,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांने निर्गमित केलेली परिपत्रके व कर्तव्य सुची यानुसार निरिक्षकांने काम करणे आवश्यक आहे. (उदा.निरिक्षक चौकशी रोजनामा-परिपत्रक क्रमांक १५६, निरिक्षक चौकशी रजिस्टर-परिपत्रक क्र-१६०,न्यास निरिक्षकांचे रजिस्टर-परिपत्रक क्र-१६० व इतर.)

तसेच असेही सुचीत करण्यात येते की, वरील नमुद केलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी सर्व संबंधीतांची राहील. जे निरिक्षक या सुचनांचे पालन करणार नाहीत, त्या निरिक्षकांच्या कामकाजाचा अहवाल धर्मादाय सह आयुक्त / धर्मादाय उप आयुक्त् / सहायक धर्मादाय आयुक्त यांनी तात्काळ मुख्यालयात सादर करावा. जेणेकरुन सुचनांचे पालन न करणा-यांवर योग्य ती कार्यवाही करता येईल.

महेंद्र के महाजन.
धर्मादाय आयुक्त्,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

सोबत :- निरिक्षक चौकशी विवरणपत्र नमुना (परिशिष्ट-अ)

**प्रत:-**

०१. सर्व धर्मादाय सह आयुक्त्
०२. सर्व धर्मादाय उप आयुक्त्
०३. सर्व सहायक धर्मादाय आयुक्त्
०४. सर्व निरिक्षक संबंधीत कार्यालया मार्फत
०५. आस्थापना शाखा- मुख्यालय
०६. तक्रार शाखा -मुख्यालय
०७. संगणक शाखा-मुख्यालय
०८. परिपत्रक धारणी

'परिशिष्ठ - क्ष'

# निरीक्षकांकडील प्रलंबित/निकाली काढलेल्या चौकशी प्रकरणांचे मासिक विवरणपत्र

कार्यालयाचे नाव - माहे व वर्ष-

निरीक्षकाचे नाव व निरीक्षक क्र.

| महिन्याच्या सुरवातीची प्रलंबित प्रकरणांची संख्या | | | महिन्यात प्राप्त झालेली नवीन चौकशी प्रकरणांची संख्या | | | एकुण चौकशी प्रकरणांची संख्या (१+२) | | | महिन्यात निकाली काढण्यात आलेल्या प्रकरणांची संख्या | | | महिन्याच्या अखेर प्रलंबित असलेल्या प्रकरणांची संख्या (३-४) | | | एकुण प्रलंबित | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | २ | | | ३ | | | ४ | | | ५ | | | ६ | ७ |
| ध.आ. | ध.स.आ. | ध.उ.आ/स.ध.आ. | ध.आ. | ध.स.आ. | ध.उ.आ/स.ध.आ. | ध.आ. | ध.स.आ. | ध.उ.आ/स.ध.आ. | ध.आ. | ध.स.आ. | ध.उ.आ/स.ध.आ. | ध.आ. | ध.स.आ. | ध.उ.आ/स.ध.आ. | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |

| प्रलंबित प्रकरणांचा वर्षनिहाय गोषवारा | | | |
|---|---|---|---|
| वर्ष | चौकशी प्रकरणांची संख्या | | |
| | ध.आ. | ध.स.आ. | ध.उ.आ/ स.ध.आ. |
| | | | |

| महिन्यात निकाली काढलेल्या प्रकरणांचा तपशिल | | |
|---|---|---|
| वर्ष | चौकशी प्रकरणांची संख्या | चौकशी क्रमांक व न्यास नोंदणी क्रमांक |
| | | |
| | | |

| निरीक्षण केलेल्या न्यासांचा तपशिल | शोधुन काढलेले न्यास |
|---|---|
| न्यास नोंदणी क्रमांक | |
| | |
| | |

निरीक्षकाकडे अतिरिक्त कार्यभार असल्यास त्याचा तपशिल-

निरीक्षक यांचे नाव व सही

निरीक्षक यांनी निकाली काढलेल्या/प्रलंबित असलेल्या चौकशी बाबत अधिकारी यांचा अभिप्राय-

दिनांक

संबंधीत अधिकारी यांचे नाव व सही